**ठळक बातम्या**

- क्रोएशियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी परतले
- QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान, आयआयटी मुंबई देशात दुसऱ्या स्थानी
- मुंबईसह कोकणातल्या सागरी किनारपट्टीवर उंच लाटा उसळण्याचा हवामान विभागाचा इशारा

**आणि**

- ख्यातनाम वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला पाच दिवसांचा परदेश दौरा पूर्ण करून आज क्रोएशिया इथून मायदेशी परतले. प्रधानमंत्री मोदी यांचा क्रोएशियाचा हा पहिलाच दौरा होता. त्यांच्या या दौऱ्यात झालेल्या उच्चस्तरीय भेटींनी दोन्ही देशांमधल्या भविष्यातल्या धोरणात्मक सहकार्याचा मार्ग मोकळा केला.

प्रधानमंत्री मोदी यांनी क्रोएशियाचे प्रधानमंत्री आंद्रेज प्लेन्कोविच यांच्याशी प्रतिनिधीमंडळ पातळीवर चर्चा केली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात जागतिक शांतता, लोकशाही मूल्य, व्यापार, तंत्रज्ञान आणि परस्परांच्या संस्कृतीमध्ये सहकार्य वाढवण्याप्रति सामायिक वचनबद्धतेवर भर दिला. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय व्यापार अधिक दृढ करण्यावर आणि लवचिक, विश्वासार्ह पुरवठा साखळी तयार करण्यावरही सहमती दर्शवली. परस्पर संबंध आणखी मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल म्हणून, दोन्ही देशांनी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा क्रोएशियाचा ऐतिहासिक दौरा मैत्री, सहकार्य आणि सामायिक जागतिक दृष्टिकोनाचा मजबूत संदेश देऊन यशस्वीपणे संपन्न झाला.

**<><><><>**

देशाचा भाषिक वारसा अभिमानानं मिरवून, स्थानिक भाषांसह जगाचं नेतृत्व करण्याची वेळ आली असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवी दिल्लीत पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. परकीय भाषांमध्ये भारतीय संस्कृती आणि इतिहास चांगल्या पद्धतीने समजत नाही. त्यासाठी स्थानिक भाषाच हव्या, असं ते म्हणाले.

<><><><>

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज नवी दिल्ली इथं 'जेंडर बजेटिंग पोर्टलचं' उदघाटन केलं. हे पोर्टल धोरणकर्ते आणि भागधारकांना लैंगिक समानतेवर आधारित अर्थसंकल्पीय पद्धती बळकट करण्यासाठी सुविधा केंद्र म्हणून काम करेल, अशी माहिती अन्नपूर्णा देवी यांनी यावेळी दिली.

यंदा एकूण अर्थसंकल्पाच्या ८ पूर्णांक ८६ शतांश टक्के रक्कम जेंडर बजेट साठी खर्च करण्यावर लक्ष केंद्रित केलं जाईल असं त्या म्हणाल्या.

<><><><>

आर्थिक गैरव्यहार केल्याप्रकरणी ओदिशातले बिजू जनता दलाचे ज्येष्ठ  दिवंगत नेते नबाकिशोर दास यांच्याशी संबंधित असलेल्या २० मालमत्तांवर आयकर विभागानं एकाच वेळी आज छापे टाकले. झारसुगुडा, संबलपूर आणि नवी दिल्लीत असलेल्या मालमत्तांवर एकाच वेळी हे छापे टाकण्यात आले आहेत.

दास यांच्या कार्यकाळात कोळसा आणि राख वाहतूक व्यवहारांमध्ये झालेली आर्थिक अनियमितता, करचुकवेगिरी आणि दास यांनी बेहिशोबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी कारवाई केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><>

नीट- एमबीबीएस प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी बिहारमध्ये पाटणा, झारखंडमध्ये रांची आणि इतर काही ठिकाणी सक्तवसुली संचालनालयानं आज छापे टाकले. प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणातला मुख्य सूत्रधार संजीव मुखिया आणि त्याच्याशी संबंधित इतर व्यक्तींच्या ठिकाणी ही छापेमारी सुरू असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

<><><><>

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्तानं २१ जून रोजी भुसावळ रेल्वे स्थानकासमोरच्या रेल्वे क्रीडांगणावर योगाभ्यास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सकाळी सात वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री रक्षा खडसे, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचं आयोजन आयुष मंत्रालय, केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय, मध्य रेल्वे विभाग भुसावळ आणि जिल्हा प्रशासन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमानं करण्यात आलं आहे.

**<><><><>**

राज्यात प्रयोगात्मक कलांचं सखोल संशोधन आणि अभ्यास करता यावा म्हणून राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पु. ल. देशपांडे कला अकादमीत स्वतंत्र संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या केंद्राला शाहीर साबळे यांचं नाव देण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज दिली. मुंबईत मंत्रालय सांस्कृतिक कार्य विभागाकडे नाटक, लोककला, संगीत, नृत्य अशा विविध प्रयोगात्मक कलांची माहिती उपलब्ध आहे. पण त्याचे वर्गीकरण, विश्लेषण आणि त्याच्यावर संशोधन होणं आवश्यक आहे. या संशोधनाचा उपयोग राज्यातल्या आणि राज्याबाहेरच्या पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे.

**<><><><>**

QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी-IIT मुंबई या शैक्षणिक संस्थेनं देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या क्रमवारीत आयआयटी मुंबईला १२९वा क्रमांक मिळाला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी-IIT दिल्ली या शैक्षणिक संस्थेनं १२३वा क्रमांक मिळवत देशातून पहिला क्रमांक पटकावला आहे. या संस्थेला आजवर मिळालेली सर्वोच्च QS जागतिक क्रमवारी आहे. या आधी ही संस्था १५० व्या स्थानी होती.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून ५४ भारतीय शिक्षण संस्थांनी QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान मिळवल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. २०१४ मध्ये केवळ ११ भारतीय विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं

आता या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या शैक्षणिक सुधारणांचं फलित असल्याचं प्रधान यांनी नमूद केलं.

**<><><><>**

मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सागरी किनारपट्टीवर आज उंच लाटा उसळतील असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. यावेळी लहान बोटींनी समुद्रात जाऊ नये, तसंच किनारपट्टी जवळ पर्यटन आणि जलक्रीडा पूर्णपणे थांबवाव्यात असे निर्देश राज्य आपत्कालीन केंद्रानं दिले आहेत.

पालघर, पुणे आणि नाशिकच्या घाट परिसरात हवामान विभागानं आज रेड अलर्ट जारी केला आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक आणि साताऱ्याच्या घाट परिसरात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, पुणे, कोल्हापूरचा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, नागपूर, वर्धा, अमरावती, भंडाऱ्यासह विदर्भाला आज यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळपासून मध्यम स्वरुपाचा पाऊस सुरू आहे. नाशिकमधे काल संध्याकाळी साडे पाच ते आज सकाळी साडे आठ वाजेपर्यंत ६१ मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली. **रायगड** जिल्ह्यात अंबा नदी आणि कुंडलिका नदी दुपारी १ वाजता धोका पातळीच्यावर वाहत होत्या. तर पाताळगंगा नदीनं इशारा पातळी ओलांडली होती. त्यामुळं प्रशासनानं नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत तसंच जिल्ह्यातल्या शाळांना सुट्टी देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.
प्रचंड पावसामुळे खडकवासला धरणातून 2 हजार क्युसेक इतका विसर्ग अर्ध्या तासापासून सुरू आहे. स्थानिक प्रशासन योग्य खबरदारी घेत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षात केलेल्या कामांची माहिती वारीमध्ये देणाऱ्या मोबाइल व्हॅनला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात हिरवा झेंडा दाखवला. वारीमध्ये ही व्हॅन चालणार आहे. त्यात विविध पोस्टर्स, नाटिकांच्या माध्यमातून वारकऱ्यांना आणि स्थानिकांना माहिती दिली जाईल. यात केंद्र सरकारच्या विविध योजनांचीही माहिती दिली जाणार आहे.

**<><><><>**

ख्यातनाम वन्य जीव अभ्यासक, पद्मश्री पुरस्कार प्राप्त मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर आज सोलापूर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. चितमपल्ली यांचं काल संध्याकाळी वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. जंगल आणि वन्य प्राण्यांवर प्रेम करणारे चितमपल्ली यांना ‘अरण्यऋषी’ म्हणून ओळखलं जातं.

चितमपल्ली यांनी महाराष्ट्र सरकारच्या वन विभागात ३६ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा केली. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यासारख्या विविध जंगलांमध्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये त्यांनी काम केलं. वन्यजीव संरक्षणात त्यांनी मोठं योगदान दिलं. नागझिरा आणि मेळघाट इथल्या विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रम उभारायला त्यांनी मदत केली.

मारुती चित्तमपल्ली यांचं साहित्य मुख्यतः मराठी भाषेत असून ते वन्यजीव, निसर्ग आणि आदिवासी जीवनावर केंद्रित आहे. पक्षीविज्ञान आणि वन्यजीवनाशी संबंधित अनेक नवीन शब्द आणि संज्ञा त्यांनी मराठी भाषेत आणल्या. अनेक पक्षी-शास्त्रीय संकल्पनांना त्यांनी मराठी नावं दिली. "चकवा चांदणं" ही त्यांची आत्मकथा प्रसिद्ध आहे. त्याशिवाय, निलवंती, जंगलाचं देणं, रातवा, रानवाटा, केशराचा पाऊस, सुवर्ण गरुड या काही त्यांच्या लोकप्रिय साहित्यकृती आहेत.

२००६ साली सोलापूर इथं झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. चितमपल्ली यांना २०१७ मध्ये, महाराष्ट्र सरकारने विंदा करंदीकर स्मृती जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित केलं. जानेवारी २०२५ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित केलं.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी चितमपल्ली यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**//<><><><>//**